

गुंतवणूक भक्कम, तर पुढची पिढी सक्षम!

सुहास राजदेरकर
suhas.rajderkar@gmail.com

बहुतेक पालकांना आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी वा अन्य उद्दिष्टांसाठी गुंतवणूक आवश्यक वाटते. परंतु, नुसती बँक किंवा पोस्ट खात्यामधील गुंतवणूक त्यांना पुरेशी वाटत नाही. याला कारण म्हणजे सतत वाढणारी चलनवाढ. त्यामुळे सुजाण पालक नेहमीच चलनवाढीपेक्षा जास्त परतावा कोणत्या योजनांमध्ये मिळेल, याच्या शोधात असतात. यासाठी त्यांना म्युच्युअल फंडांच्या इक्विटी योजना नेहमीच आकर्षक वाटत आल्या आहेत.

सुनील : अनिलराव, हे घ्या नातवाच्या बारशाचे पेढे आणि रागावू नका हो, घरच्या घरीच केले बारसे, त्यामुळे फारसे कोणाला बोलावले नाही.

अनिल : तुम्ही आवर्जून पेढे घेऊन आलात त्याबद्दल धन्यवाद आणि बोलावण्याचे म्हणाल तर तुमचे बरोबरच आहे. अहो, ही महिन्या-दोन महिन्यांची मुले खूप नाजूक असतात आणि बारसे म्हटलं की लोक हात लावणार, कडेवर घेणार, जे टाळले पाहिजे.

सुनील : एक बरे आहे, मुलगा झाला. मुलगी असती तर लगेच लग्नासाठी सोने आणि पैसे साठवायला लागले असते.

अनिल : अहो सुनीलराव, कोणत्या जमान्यात राहता तुम्ही? उलट मुलगा असल्याने त्याच्यासाठी जास्त पैसे साठवावे लागतील.

सुनील : ते कसे?

अनिल : असे पाहा, मुलगी असेल तर लग्न करून दिले, की तुम्ही मोकळे होता. हल्ली कोणीही हुंडा तर मागत नाहीच; पण लग्नाचा खर्चसुद्धा निम्मा-निम्मा करतात. असे दिसून आले आहे, की मुलाकडचे लोक हौसेने लग्नामध्ये जास्त खर्च करतात. दुसरे असे पाहा, की मुलगा असेल तर त्याचे नुसतेच शिक्षण, उच्च शिक्षण करून भागत नाही. हल्ली मुले नोकरीच्या मागे न धावता, स्वतःचा व्यवसाय, एखादे स्टार्ट-अप सुरु करण्याकडे त्यांचा कल असतो आणि याला सुरुवातीला आपल्याला बरेच पैसे गुंतवावे लागतात. शिवाय मुलगा म्हटले म्हणजे त्याचे लग्न करायचे तर त्याला स्वतःचे स्वतंत्र घर हवे अशा पुष्कळशा अटी मुलींच्या पण असतात. म्हणजे त्याच्या स्वतंत्र घरासाठी पैसे जमवा. त्यातून त्याची मुंबईमध्ये नोकरी असेल तर कठीणच; कारण मुंबईतील घरांचे भाव हे सर्वसामान्य माणसांच्या आवाक्यात नाहीत. त्यामुळे, मुलगा असेल तर लगेच प्लॅनिंग करून त्याप्रमाणे गुंतवणुकीला सुरुवात करायला हवी.

सुनील : अरे बापरे, तुम्ही म्हणता तसा आम्ही कधी विचारच केला नाही हो. मग आता?

अनिल : घाबरून जायचे कारण नाही. असे पाहा, की तुमच्या हातात वेळ भरपूर आहे. जवळजवळ २० वर्षे आहेत. त्यामुळे तुम्ही एखाद्या चांगल्या आर्थिक सल्लागाराला भेटा म्हणजे तो किंवा ती, तुम्हाला योग्य ते मार्गदर्शन करतील.

सुनील : चांगले सांगितलेस. आजच मी माझ्या मुलाशी या विषयावर बोलतो.

*****

पाल्यांसाठी आजही पालक पारंपारिक गुंतवणुकीमध्ये अडकून पडलेले दिसतात, ज्यामुळे मुलांचे नुकसान संभवते. पारंपारिक गुंतवणुकीत जसे, की बँक, पोस्ट ऑफिस आदींमध्ये व्याजाची जरी खात्री असली तरीही ते चलनवाढीपेक्षा कमी असते आणि त्यावर प्राप्तिकर लागू होतो. प्रत्यक्ष सोने आणि रिअल इस्टेट यातून बाहेर पडून, शेअर, म्युच्युअल फंड याकडे सकारात्मक नजरेने पाहावे; जेणेकरून चलनवाढीपेक्षा अधिक परतावा मिळू शकतो. पारंपारिक गुंतवणूक अजिबात नको, असे नाही. परंतु, शिक्षण क्षेत्रामधील प्रत्येक वर्षी होणारी मोठी चलनवाढ पाहता, गुंतवणुकीमध्ये विविधता हवी आणि थोडी अस्थिरता सहन करून म्युच्युअल फंडांकडे सकारात्मकतेने पाहणे आवश्यक वाटते.

मुलांच्या प्रत्येक उद्दिष्टासाठी किती खर्च येणार आहे, ते माहिती करून घ्यायला हवे. उदाहरणासाठी सोबतचा तक्ता पाहा.

(चौकट क्रमांक १ पाहा)

गुंतवणूक करणे सोपे!

अठरा वर्षांखालील, लहान मुलांच्या नावे म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करणे आता अधिक सोपे झाले आहे. 'सेबी'ने नुकत्याच

चौकट क्रमांक 1

मुलीचे आजचे वय	५ वर्षे
पदव्युत्तर शिक्षण	२१ व्या वर्षी
आज येणारा खर्च	१० लाख रुपये
शिक्षणासाठीची चलनवाढ	१० टक्के प्रति वर्षी
१६ वर्षांनी **येणारा खर्च**	४६ लाख रुपये
४६ लाख उभे करण्यासाठी गुंतवणूक कोठे व कशी करा?	
इक्विटी म्युच्युअल फंड 'एसआयपी'	८००० रुपये दरमहा

(१२ टक्के दरवर्षी परतावा गृहीत)

जारी केलेल्या नव्या नियमांनुसार, पालकांना जर मुलांच्या नावे म्युच्युअल फंडांच्या कोणत्याही योजनांमध्ये गुंतवणूक करायची असेल, तर आता पालक त्यांच्या स्वत:च्या बँक खात्यामधून ही गुंतवणूक करू शकतात. त्यासाठी त्यांना त्या मुलाच्या नावे बँक खाते उघडण्याची आवश्यकता नाही. यापूर्वी असलेल्या नियमांनुसार जर तुम्हाला लहान (मायनर) मुलाच्या नावे म्युच्युअल फंडांच्या योजनांमध्ये गुंतवणूक करायची असेल, तर त्या लहान मुलाचे किंवा मुलीचे बँक खाते आवश्यक होते. मुलांच्या नावावर बँक खाते नसेल तर अशी गुंतवणूक तुम्हाला करता येत नव्हती. याला एकमेव अपवाद होता, चिल्ड्रन गिफ्ट फंड योजनांचा. पूर्वीच्या नियमांनुसार, चिल्ड्रन गिफ्ट फंडामध्ये पालकांना मुलांच्या नावावर गुंतवणूक करता येत होती आणि त्यासाठी मुलांच्या नावाचे बँक खाते आवश्यक नव्हते. आता सर्वच योजनांसाठी ही आवश्यकता संपली आहे.

बहुतेक पालकांना आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, उच्च शिक्षणासाठी, लग्नासाठी वा अन्य उद्दिष्टांसाठी गुंतवणूक आवश्यक वाटते. परंतु, नुसती बँक किंवा पोस्ट खात्यामधील गुंतवणूक त्यांना पुरेशी वाटत नाही. याला कारण म्हणजे सतत वाढणारी चलनवाढ. त्यामुळे सुजाण पालक नेहमीच चलनवाढीपेक्षा जास्त परतावा कोणत्या योजनांमध्ये मिळेल, याच्या शोधात असतात. अशा योजना, ज्या सरकारमान्य असतील आणि दीर्घकाळासाठी त्यात गुंतवणूक केली, तर पारंपारिक गुंतवणूक पर्यायांपेक्षा या योजनांमध्ये अधिक परतावा मिळेल; जो चलनवाढीवर मात करू शकेल. यासाठी त्यांना म्युच्युअल फंडांच्या इक्विटी योजना नेहमीच आकर्षक वाटत आल्या आहेत. म्युच्युअल फंड उद्योग सरकारमान्य आहे. गुंतवणुकीला डी-मॅट खाते आवश्यक नाही. म्युच्युअल फंडांच्या इक्विटी योजनांमध्ये दीर्घकाळासाठी गुंतवणूक केली, तर वर्षाला साधारणपणे १३ ते १५ टक्के परतावा सहज मिळतो. दर महिन्याला थोडी-थोडी रक्कम 'एसआयपी' पद्धतीने अशा योजनांमध्ये गुंतवण्याची उत्तम सोय आहे. एकदम एकाच वेळी मोठी रक्कम गुंतवण्याची आवश्यकता नाही. तसेच, लहान मुलांच्या नावावर आणि लहान मुलांसाठी ही गुंतवणूक असल्याने १० ते १५ वर्षांचा काळ गुंतवणुकीसाठी सहज देता येतो. 'एसआयपी'मुळे शेअर बाजाराची जोखीम मोठ्या प्रमाणात कमी होऊन परतावा वाढतो. तसेच, प्राप्तिकर फायदेसुद्धा आहेतच. शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंड इक्विटी योजनांनी, कोणत्याही ५, १०, १५ वर्षांच्या काळामध्ये सकारात्मक अर्थात 'पॉझिटिव्ह' परतावा दिला आहे.

पंधरा जून २०२३ पूर्वी, अशा गुंतवणुकीसाठी लहान मुलांच्या नावावर बँक खाते सुरु करावे लागायचे. त्यासाठी काही कागदपत्रे लागायची, जसे की मुलांचा जन्म दाखला, आधार कार्ड वगैरे. बहुतेक पालक त्यामध्ये टाळाटाळ करायचे किंवा ते सतत पुढे ढकलायचे. त्यामुळे लहान मुलांच्या नावावर म्युच्युअल फंडांमधील गुंतवणुकीचे प्रमाण कमी होते. 'सेबी'च्या नव्या नियमांनुसार आता ही गुंतवणूक लांबणीवर पडणार नाही. पालक त्यांच्या पाल्यासाठी, इक्विटी म्युच्युअल फंड; तसेच इतर रोखे योजनांचा सुद्धा लाभ घेऊ शकतील. यामध्ये एकच गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे पैसे काढताना मात्र ते मुलांच्या नावानेच देण्यात येतील; त्यामुळे त्यासाठी पुढील काळात मुलांच्या नावावर बँक खाते सुरु करणे आवश्यक राहील. अर्थात यासाठी गुंतवणूक पुढे ढकलण्याची आवश्यकता राहणार नाही.

चौकट क्रमांक 2 : मुलांना लहान वयात काय शिकवाल?

काय शिकविणे आवश्यक नाही?	काय शिकविणे आवश्यक आहे?
बँकेतून पैसे कसे काढावेत, चेक कसा भरावा,	एटीएम, पेटीएम, गुगल पे, युपीआय, आरटीजीएस आदी
बँकेतील लॉकरचे कार्य	पेपर गोल्ड, गोल्ड ईटीएफ, ऑनलाईन लॉकर
पारंपारिक गुंतवणूक पर्याय	शेअर, म्युच्युअल फंड, ईटीएफ
प्रत्यक्ष सर्टिफिकेट	डी-मॅट खाते
रेशन कार्ड	पॅन कार्ड, आधार कार्ड,
सही	डिजिटल सही, केवायसी
पाकीट	मोबाईल, व्हॉट्सॲप, इ-मेल
पारंपारिक गुन्हे	सायबर, ऑनलाईन गुन्हे

शेअर बाजार : फेस व्हॅल्यू, रेकॉर्ड तारीख, एक्स बोनस, इंट्रा-डे, नफा कसा मोजाल, एफ अँड ओ, बायबॅक, आयपीओ- प्राईस बँड, मिनिमम लॉट, लिस्टिंग, ऑनलाईन अप्लाय

म्युच्युअल फंड : एनएव्ही, एनएफओ, रेग्युलर, डायरेक्ट, डिव्हिडंड, ग्रोथ, एसआयपी, एसटीपी, एसडब्ल्यूपी, कट ऑफ डेट

तात्पर्य : लहान मुलांच्या नावावर इक्विटी म्युच्युअल फंड योजनांमध्ये एक तरी 'एसआयपी' जरूर सुरु करा. म्युच्युअल फंडामधील गुंतवणूक ही बाजारातील जोखमीवर अवलंबून असल्याने अशी गुंतवणूक करताना तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.

(लेखक एx्एस फायनान्शिअल सोल्युशन्सचे प्रवर्तक आहेत. ९८२३६६६९१३)